GUANGDONG HONG KONG Life STYLE in Mumbai EXPO
时尚生活汇展·孟买
28-30 October 2010
Grand Hyatt Mumbai, Exhibition Ground
Off Western Express Highway, Santacruz (East),
Mumbai, India
www.lifestyleexpomumbai.com

Print Title: Mumbai Chaufer

Date: 24 Oct 2010

# हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंटचा मुंबईत 'लाइफस्टाइल एक्स्पो'

मुंबई - आशियातील एक प्रख्यात डिझाईन केंद्र असलेले हाँगकाँग आणि गुआँगडाँग हे आपल्या उत्पादक कौशल्यासाठी सर्वश्रुत आहे. हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिल, डिपार्टमेंट ऑफ फॉरेन ट्रेड अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन ऑन गुआँगडाँग प्रोव्हिन्सच्या सहकार्यातून भारतीय ग्राहकांसाठी 'लाइफस्टाइल एक्स्पो ईन मुंबई'चे २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान आयोजन करण्यात आले आहे. 'एलईएम २०१०'मध्ये भारतीय कंपन्यांना हाँगकाँग आणि गुआँगडाँग प्रोव्हिन्समधील दर्जेदार जीवनशैली उत्पादनांची विस्तृत रेंज उपलब्ध होणार आहे. एका अनोख्या अशा ट्रेड शोचे भारतात पहिल्यांदाच आयोजन करण्यात आले आहे. 'एलईएम २०१०'चा सर्व भर उच्च दर्जाची उत्पादने आणि बँड्सवर असणार आहे. त्या माध्यमातून भारतीय रिटेलर्स आणि हाँगकाँग आणि गुआँगडाँग येथील उत्पादक यांच्यादरम्यान नवीन व्यवसाय भागीदारी स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.